RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ७(२)] बुधवार, जानेवारी १४, २०२६/पौष २४, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
दिनांक १३ जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक खाक्षेस-२००५/प्र.क्र.१३५(भाग-१)/रस्ते-९अ.— ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई आणि मेसर्स सुप्रिम सुयोग फ्युनिक्युलर रोपवे प्रा. लि. येथे आहे, यांचे मध्ये खाजगीकरणांतर्गत "बी.ओ.टी." तत्त्वावर "खाजगीकरणाच्या माध्यमातून हाजीमलंग गड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे 'बांधा, वापरा, हस्तांतर करा' या तत्त्वावर फ्युनिक्यूलर ट्रॉली सिस्टीम बसवणे." या प्रकल्पाचा करारनामा दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ रोजी सांक्षांकित करण्यात आलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, करारदाराने या उद्देशासाठी "मि./सुयोग सुप्रीम फ्युनिक्युलर रोपवे प्रा. लि." या नावाने एसपीव्ही स्थापन केली असून, शासनाने करारनाम्याच्या खंड क्र. ०२ मधील पृ.क्र.१४ वरील कलम ०२ अनुसार, पत्र क्र. पीएसपी २००५/सी.आर.१३५/रोड-९अ, दिनांक १८ सप्टेंबर २०१२ अन्वये त्यास मंजुरी दिली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी धारणा आहे की, सदर प्रकल्पाचे बांधकाम, वापर आणि देखभाल दुरुस्ती ही जनतेला दिलेली विशेष सेवा आहे आणि त्यामुळे सदर प्रकल्पासाठी प्रकल्पाच्या आवारात प्रवाशांसाठी हाजीमलंग गड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे तिकीटघर उभारुन तिकीट दर आकारणे व वसुली करणे महाराष्ट्र शासनास योग्य वाटत आहे ;

आणि ज्याअर्थी, या करारानुसार, करारदारास दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासून २५ वर्षे ०५ महिने कालावधीपर्यंत "सदर प्रकल्प" उभारणी, संचालन व देखभालीचा अधिकार दिला गेला आहे, ज्यामध्ये २४ महिन्यांचा बांधकाम कालावधी समाविष्ट आहे.

आता महाराष्ट्र शासन याद्वारे घोषित करते की, खाजगीकरणाच्या माध्यमातून "बीओटी" तत्त्वावर मेसर्स सुप्रिम सुयोग फ्युनिक्युलर रोपवे प्रा. लि. यांनी स्वखर्चाने "खाजगीकरणाच्या माध्यमातून हाजीमलंग गड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे 'बांधा, वापरा, हस्तांतर करा' या तत्वावर फ्युनिक्यूलर ट्रॉली सिस्टीम बसवणे." या प्रकल्पांतर्गत बांधकाम केलेल्या फ्युनिक्युलर रोपवेचा वापर करणाऱ्या भाविकांसाठी व खालील अनुसूचीच्या स्तंभ (३ व ४) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या वयोगटातील प्रवाशांसाठी व मालवाहतुकीसाठी दिनांक १४ जानेवारी, २०२६ ते ३१ डिसेंबर, २०२७ या कालावधीसाठी त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने शुल्क वसुली करण्याकरिता

मेसर्स सुप्रिम सुयोग फ्युनिक्युलर रोपवे प्रा.लि. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | वर्ष (२) | प्रवासी वाहतूक दर (रु.) (३) | | | माल वाहतूक दर (रु.) (४) |
|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग अ प्रवासी (परतीच्या प्रवासासह) | वर्ग ब प्रवासी (परतीच्या प्रवासासह) | त्रैमासिक प्रवासी | प्रति किलो |
| १ | १४ जानेवारी,२०२६ ते ३१ डिसेंबर,२०२७ | १५०.०० | ७५.०० | १०५०.०० | ५ |

**१.** वर दर्शविलेल्या फ्युनिक्युलर रोपवेचा वापर करणाऱ्या भाविकांकडून शुल्क गोळा करण्याचा व संपूर्ण रक्कम ठेवून घेण्याचा हक्क मेसर्स सुप्रिम सुयोग फ्युनिक्युलर रोपवे प्रा.लि. यांना प्रदान करण्यात आला आहे.

**२.** प्रवासी यांचे वर्गीकरण.

१. वर्ग ‘अ’ प्रवासी म्हणजे ३ फुट ६ इंच ( १०५ सेमी. ) पेक्षा जास्त उंची असलेली व्यक्ती आणि ७५ वर्षे वयाखालील व्यक्ती, वर्ग अ प्रवाशासाठी पूर्ण दराने आकारणी.

२. वर्ग ‘ब ‘ प्रवासी म्हणजे ३ फुट ६ इंच ( १०५ सेमी. ) पेक्षा कमी उंची असलेली व्यक्ती आणि ७५ वर्षे वयावरील व्यक्ती, तसेच चालण्याचे अपंगत्व असलेली व्यक्ती. वर्ग ब प्रवाशासाठी अर्ध्या दराने आकारणी.

३. ३ वर्षाखालील मुलांना तिकीट दरातुन सुट.

४. प्रत्येक प्रवासी आपल्यासोबत जास्तीत जास्त ५ किलो साहित्य बाळगु शकतो त्यावरील जास्तीच्या वजनासाठी मालवाहतूक दराने आकारणी करण्यात येईल.

**३.** खालील प्रवासी धारकांना तिकीट दरातून सूट देण्यात येईलः-

१. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य, लोकसभा व राज्यसभेचे माजी सदस्य, महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य, महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेचे माजी सदस्य;

२. महाराष्ट्र शासन सा.बा.विभागाचे कार्यकारी अभियंता व त्यावरील वरिष्ठ दर्जाचे सा.बां.विभागाचे अधिकारी यांना तिकीट दरातुन सुट.

**४.** तिकीट दर व माल वाहतूक दराचा फलक सर्वांना दिसेल अशा पध्दतीने तिकीट काऊंटर जवळ लावण्यात यावा.

**५.** तसेच प्रवासीधारकास प्रत्येक वेळी संगणकीकृत पावती देण्यात यावी.

**६.** इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा फलक सर्वांना दिसेल अशा पध्दतीने प्रकल्पाच्या प्रवेशव्दाराजवळ लावण्यात यावा.

**७.** हाजीमलंग गड येथील स्थानिक रहिवासी आणि व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी त्रैमासिक सवलत पास फोटो सहीत देण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रज्ञा वाळके,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,

Dated 13th January, 2026.

*NOTIFICATION*

No.PSP-2005/C.R.135/Part-1/Road-9A.— Whereas, the Governor of Maharashtra through Secretary, Public Works Department, Mantralaya, Mumbai and M/s. Supreme Suyog Funicular Ropeway Pvt. Ltd. 8, Bhavani Services Industrial Estate, I.I.T Main Gate, Powai, Mumbai- 400 076 have entered into Concession Agreement, on the 22nd February 2012, including all the subsequent agreements entered between them, for construction, operation and maintenance of "Construction of Funicular Trolly System under BOT at Hajimalang Gad, Taluka-Ambernath, Dist. Thane" (here in after referred to as "the said Project"), constructed under the Build, Operate and Transfer (BOT) Scheme;

And whereas, Concessionaire has created a SPV for this purpose in the name of "M/s. Supreme Suyog Funicular Ropeway Pvt. Ltd." as per contract Volume II page No.14 , Clause No. 02 and Government *vide* its letter No. PSP 2005/C.R.135/Road-9A, dated the 18th September 2012 has approved the same;

And whereas, as per the said agreement, the concession period of 25 years, 05 Months has been granted to the concessionaire to construct, operate and maintain "the said project" from the date of commencement of the work. *i.e.*, on the 22nd February 2012, which includes the period of construction of 24 Months;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that the construction, operation and maintenance of the said project is special service to the public and, therefore, after completion of the said work, considers it expedient to levy and collect the user fee on the said project at the Ticket Counter constructed in the premises of the project at Haji Malang Gad, Taluka Ambernath.

Now therefore, the Government of Maharashtra hereby declares that the user fee shall be levied for the passangers using Funicular Trolley as specified in column (3, 4 & 5) of the Schedule appended hereto constructed under the "Build, Operate and Transfer (BOT) Scheme" by M/s. Supreme Suyog Funicular Ropeway Pvt. Ltd., at their expenses, at the Ticket Counter, constructed in the premises of the said project at HajiMalang Gad, Taluka Ambernath, Dist. Thane for the period commencing from the **14th January, 2026 and ending on the 31st December 2027.**

*Schedule*

| Sr. No. (1) | Year (2) | User Fee for passangers (In Rs.) (3) | | | Freight for Goods (In Rs.) (4) |
|---|---|---|---|---|---|
| | | Class A Passengers (To and Fro journey) | Class B Passengers (To and fro journey) | Quarterly Pass (In Rs.) | Per K.g. |
| 1 | 14th January, 2026 to 31st December 2027 | 150.00 | 75.00 | 1050.00 | 5 |

1. For the purpose of this notification, M/s. Supreme Suyog Funicular Ropeway Pvt. Ltd. is authorized to collect and retain the amount of user fee at the project premises constructed at HajiMalang Gad, Taluka Ambernath.

2. Classification of passengers is as below-

   i) Class A- Passengers of age group 12 to 75 years. Class A passengers shall have to pay full fare.

ii) Class B- Passengers of age group 3 to 12 years and also the person beyond the age of 75 years and walking disability persons. Class B passengers shall have to pay half fare.

iii) Each passenger can carry maximum permissible 5.00 kg household luggage along with him/her while traveling in finicular car and luggage more than 5.00 kg can be transported in luggage ropeway with charge as per frieght rates shown in user fee rates.

3. Passengers of age group below 3 years do not require ticket.

4. The dignitaries mentioned below are exempted from payment of user fee.

i) President of India, Vice President of India, Governor of State, Public Representatives.

ii) Sitting members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

iii) Ex-members of Parliament from Maharashtra, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

iv) Foreign dignitaries travelling on State visit (on reciprocal basis country wise concession for consulate).

5. Ticket Rates and Freight Rates shall be displayed on boards clearly visible to people in the vicinity of Ticket Collection Centre.

6. Electronic display board clearly visible to the people should be installed at the entrance of the project.

7. Computerized fee receipt should be provided to each passenger.

8. Quarterly concession passes with photo identity will be issued for passengers residing and doing business at Hajimalang Gad.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRADNYA WALKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.